International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.065
Vol.7 No.4 Mar–Apr 2020

# ग्रामीण विकासात पंचायतराजची भुमिका

**डॉ. आकाश शेषराव बांगर**
**संशोधक विद्यार्थी, आदर्श महाविद्यालय, हिंगोली**

प्रस्तावना

ग्रामीण विकास ही संकल्पना बहुआयामी स्वरूपाची व निरंतर चालणारी एक प्रक्रिया आहे. केंद्र व राज्य सरकार ग्रामीण विकास करण्यासाठी वेगवेगळ्या योजना, धोरण व कार्यक्रम ठरविते. त्या सर्वांनाची अंमलबजवणी पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून करीत असते. पंचायतराज व्यवस्था ग्रामीण भागातील विकासाच्या योजना, धोरणा, कार्यक्रम किती जबाबदारीयुक्त, कार्यक्षमपणे व पारदर्शक पद्धतीने राबविते व त्यांची किती प्रभावीपणे अंमलबजावणी करते, खऱ्या अर्थाने यावरच ग्रामीण भागाचा विकास अवलंबून असतो.

ग्रामपंचायत, पंचायतसमिती व जिल्हापरिषद या त्रिस्तरीय व्यवस्थेचा समावेश पंचायतराज व्यवस्थेत होतो. पंचायतराज ही कल्पना महात्मा गांधीजीची आहे. भारत हा खेडयाचा देश असुन जो पर्यत खेडयाचा विकास होत नाही. खेडी स्वावलंबी व स्वयपुर्ण होत नाहीत, ग्रामीण भागात जोपर्यंत शिक्षण, पिण्याचे स्वच्छ पाणी, आरोग्य, रोजगार यांचा पुरेसा विकास होणार नाही, तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही असे महात्मा गांधीजींनी प्रतिपादन केले होते.

पंचायतराज व्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी विविध समित्या गठीत करण्यात आल्या. अखेर 1992 ला 73 व्या घटनादुरुस्ती करून पंचायतराजला घटनात्मक दर्जा प्राप्त झाला. पंचायतराजसाठी संविधानाच्या ११ व्या परिशिष्टात 29 विषयांची यादी दिली आहे. ते 29 विषयाचे कार्य पंचायतराजला अनिवार्य आहे. या 29 विषयांचा कार्यातून ग्रामीण विकासात पंचायतराजची भूमिका स्पष्ट होते. भारतीय राज्यघटनेने 73 वि घटनादुरुस्ती करून पंचायतराज

व्यवस्थेला नवी शक्ती व गती प्रदान करण्यात आली आहे. निष्क्रीय असणाऱ्या पंचायतराज संस्था पुररुज्जीवित होऊन लोकशाही विकेंद्रीकरण व ग्रामीण विकासाला चालना मिळाली आहे.

**उद्देश**

१. पंचायतराज व्यवस्थेचा अभ्यास करणे.

२. ग्रामीण विकासात पंचायतराज व्यवस्थेची भूमिका तपासणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधनात्मक शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. त्यासाठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग केला आहे. दुय्यम तथ्ये संकलनासाठी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील संदर्भग्रंथ इंटरनेट सेवा इ. माध्यमांचा उपयोग केला आहे.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम तथ्य संकलनाचा उपयोग केला आहे. त्यात संदर्भग्रंथ, पुस्तके, वृत्तपत्रे, इंटरनेट इ. चा उपयोग केला आहे.

**कृषी विकासाबाबत भूमिका**

ग्रामीण भागाचा मुख्य व्यवसाय शेती आहे. पंचायतराजच्या माध्यमातून कृषी विषयक विकासाच्या विविध योजना राबविले जातात. जसे बियाणे, खत वाटप, शेती उपयोगी साहित्य, कृषी प्रशिक्षण, शेतीतचे औषधीवाटप इत्यादी. पंचायतराज व्यवस्थेत या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र कृषी विभाग आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मार्फत, हया योजनांची अंमलबजावणी गावपातळीवर पर्यंत होतांना दिसते. यातूनच कृषी विकासाला चालना देण्याचे कार्य पंचायत करते.

**शैक्षणिक भूमिका**

शिक्षण हे सक्तीचे व मोफत करण्यात आले आहे ग्रामीण भागात शिक्षणाची व्यवस्था पंचायत राज मार्फतच करण्यात आली आहे प्रत्येक खेडयात जिल्हा परिषद शाळा स्थापन केल्या या शाळेचे व्यवस्थापन पर्यवेक्षक नियंत्रण शैक्षणिक साहित्याचा पुरवठा व शिक्षकांचा नियुक्त यांचे सर्व संस्थापक पंचायत राज व्यवस्थेला करावे लागते.

**दूग्ध व पशुसंवर्धन विकासाची भूमिका**

ग्रामीण भागातील मुख्य व्यवसाय शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पशुसंवर्धन व दूध व्यवसायाला केला जातो पारंपारिक पद्धतीने शेती करताना बैलाची आवश्यकता असते. तसेच सेंद्रिय खताची आवश्यकता असते यासाठी पशुसंवर्धन करणे गरजेचे आहे या पशुचे संवर्धन व्हावे

म्हणून पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून अनेक योजना व कार्यक्रम राबविले जातात. उदा :- पशुवैद्यकीय दवाखाना, गोशाळा गुरांचे प्रदर्शन व मेळावे भरविणे, गुरांची चारा व्यवस्था, दूग्ध विकासाला चालना देणे, सुधारित पैदाशी जनावराचे वितरण करणे. इ.

**सार्वजनिक आरोग्य विषयक भूमिका**

पंचायत राजच्या माध्यमातून ग्रामीण भागात वैद्यकीय सेवा देण्यात येत प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना प्रत्येक गावात करण्यात येते या केंद्रमार्फत मोफत आरोग्य विषयक कार्यक्रम फिरते आरोग्य पथक गावोगावी नर्सची व्यवस्था, बालकांची विशेष काळजी त्याचे सर्व लसीकरण व्यवस्था इ. आरोग्य व वैद्यकीय सेवा पंचायतीच्या माध्यमातून राबविले जातात.

**पाणीपुरवठा विषयक भूमिका**

ग्रामीण भागातील प्रत्येक गावाला स्वच्छ पिण्याचे पाणी पुरवण्याची जबाबदारी पंचायतराज वरच असते. प्रत्येक गावात नळ योजनांची व्यवस्था करणे, पाणीपुरवठा करण्यासाठी विविध साधनांचा वापर करणे तसेच विहीर हातपंप नळ इ. पाण्याची टंचाई असणाऱ्या गावात टँकर द्वारे पाणीपुरवठा करणे प्रत्येक गावाला पाण्याची व्यवस्था करण्याचे काम पंचायतीलाच करावे लागते.

**स्वच्छते विषयक भूमिका**

विविध अभियानाचा माध्यमातून पंचायतराज ग्रामीण भागातील स्वच्छतेचे काम करीत असते. ग्राम स्वच्छतेसाठी अनेक कार्यक्रम राबविले जातात. यामध्ये संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान हगांणदरीमुक्त गाव निर्मल ग्राम स्वच्छता अभियान यासारखे अनेक कार्यक्रम राबविले जातात या माध्यमातून ग्राम स्वच्छतेला चालना मिळते.

**सार्वजनिक रस्ते दिवाबत्ती विषयक भूमीका**

ग्रामीण भागातील अंतर्गत गावातील रस्ते व लाईटची व्यवस्था ही ग्रामपंचायत करते या कामासाठी राज्य शासन कडून निधी मिळतो तसेच ग्रामपंचायत मिळणारा कराचा माध्यमातून रस्ते दिवाबत्तीची देखभाल दुरुस्ती करण्यासाठी खर्च करता येतो हे कार्य करताना ग्रामपंचायती मार्फत होते त्यावर पंचायत समिती व जिल्हा परिषदेचे नियंत्रण असते अलीकडे शेतातील पादंण रस्त्याची व्यवस्था पंचायतीच्या माध्यमातून होताना दिसते.

**महिला व बालकल्याण विषयक भुमिका**

महिला व बचत गटांना प्रोत्साहन देणे त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करणे आर्थिक अनुदान देणे, गृह उद्योगाची माहिती देणे, गरोदर महिलांना सकस आहाराची व्यवस्था करणे, लसीकरणाची व्यवस्था करणे, कुंटुब कल्याण कार्यक्रम राबविणे इत्यादी कार्यक्रम पंचायतराजच्या माध्यमातून राबविली जातात. त्यातून ग्रामीण विकासाला पाठबळ मिळते.

**ग्रामीण गृहनिर्माण योजना**

ग्रामपंचायतीमार्फत इंदिरा आवास योजना व घरकुल योजना राबविल्या जातात. ग्रामीण भागातील गरिबी व दारिद्र रेषेखालील लोकांसाठी राज्यसरकारच्या गृहनिर्माण योजना आहेत पंचायत राजच्या माध्यमातून या योजनांची अंमलबजावणी होताना दिसते.

**सिंचन विषयक भूमिका**

ग्रामीण भागात सिंचनाची व्यवस्था ही सिंचन विषयक असणाऱ्या विविध योजनेच्या माध्यमातून केली जाते या योजनेचा राबविण्यासाठी ग्रामपंचायतीने केंद्र व राज्य सरकारकडून प्राप्त होतो. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून ग्रामपंचायती द्वारे ही कार्य पार पाडली जातात कोल्हापूर बंधारे शेततळे लहान-मोठी धरणे पाणलोट क्षेत्राचा विकास करणे मान तीनाल बांध तयार करणे इ. सिंचनाची कामे पार पाडली जातात.

**राजकीय स्वरूपाची भूमिका**

पंचायत राज व्यवस्था ही लोकशाहीची पाठशाला आहे असे प्रतिपादन पंडित नेहरूजी यांनी केले . पंचायत राज्याच्या माध्यमातून ग्रामीण राजकीय नेतृत्व उदास येताना दिसताना प्रामुख्याने 73 व्या घटना दुरुस्तीने जे आरक्षण दिले त्यामुळे समाजातील सर्व रस्त्यातील जनतेला आरक्षणाचा फायदा होताना दिसतो सामाजिक दृष्ट्याने मागासवर्गांना अनेक राजकीय पद मिळवताना दिसतात. महिला सर्व सामान्य व्यक्ती मागास व्यक्ती सरपंच झाल्याचे आपणास बघण्यास मिळते. पंचायत राजच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात राजकीय जागृती व नेतृत्व बघण्यास मिळत आहे.

**सर्वांगीण ग्रामीण विकासाच्या दृष्टीने भूमिका**

ग्रामीण विकासाच्या अनुषगांने पंचायत राजची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील सामाजिक, राजकीय, आरोग्य, शैक्षणिक, कृषी, शिक्षण, महिला व बालकल्याण, आर्थिक, आधुनिक तंत्रज्ञान अशा स्वरूपाचे सर्व प्रकारचे कार्य पार

पाडावी लागतात. 73 व्या घटना दुरुस्तीतील ११ व्या परिशिष्टातील 29 विषयांचा अनिवार्य कार्यक्रमांमध्ये समावेश केल्यामुळे ग्रामीण विकासाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने पंचायतराजची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्यामुळे ग्रामीण विकासाच्या एकमेव मार्ग म्हणजेच पंचायत राज्य व्यवस्था असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष**

वरील सर्व कार्यांची अंमलबजावणी व्यवस्थेतील झाल्यास या ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास निश्चितच होतो परंतु या सर्व कार्याची अंमलबजावणी पंचायतराज व्यवस्था कार्यक्रम व पारदर्शक पद्धतीने करते काय? हा एक मोठा प्रश्न पंचायत राज व्यवस्थेवर निर्माण होतो. केंद्र व राज्य सरकार ग्रामीण भागाचा विकासासाठी भरपूर प्रमाणात निधी उपलब्ध करून देत परंतु अजूनही त्याप्रमाणे ग्रामीण भागाचा विकास मानावा तेवढा झाला नाही. ज्या गावांमध्ये पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून ग्रामपंचायतीने पारदर्शक व कार्यक्षम या ग्रामीण विकासाच्या योजना व कार्यक्रमाची अंमलबजावणी केली त्या गावाचा विकास झाल्याचे दिसून येते म्हणूनच ग्रामीण भागाचा विकास करायचा असेल तर पंचायतराज व्यवस्थेचे सक्षमीकरण करून कार्यक्षम व पारदर्शक व्यवहार करणे अनिवार्य आहे. त्यासाठी ग्रामसभेला जागृत करणे आवश्यक आहे.

१. प्रा. अशोक सोनकांबळे महाराष्ट्रातील ग्रामीण आणि नागरी स्थानिक स्वशासन, अरुणा प्रकाशन, लातूर.

२. अण्णा हजारे, ग्रामसभा, प्रभात प्रयोग वर्क्स, पुणे.

३. डॉ. कांताराव पोले, महाराष्ट्रातील पंचायतीराज आणि महिला आरक्षण, अरुणा प्रकाशन, लातूर.

४. प्रा. गोविंद यमलवाड, स्थानिक स्वराज्य संस्था, कल्पना प्रकाशन, नांदेड,

५. शाम दौडेकर,पंचायतराज,कारभार आणि योजना, श्रीमुद्रा ऑफसेट, पुणे.

६. प्रा. महाजन संजय, ग्रामीण विकासान आयाम, राजवीर परलीकाशन, परभणी

७. संपादक लोकराज्य एप्रिल २०१२.